# अनाथ आरक्षणाबाबत सूचना

अनाथांसाठीचे आरक्षणाच्या व्याख्येत सुधारीत बदल करुन दिनांक २३ ऑगस्ट २०२१ चा शासन निर्णय लागू केला आहे. सदर दिनांकापासून पुढे होणा-या नोकरभरती व शैक्षणिक प्रवेशासाठी हा निर्णय लागू झाला आहे. तसेच दिनांक ०२ एप्रिल २०१८ नंतर नव्या पदभरतीचा अंतिम निकाल जाहीर करण्यांत आलेला नसेल तर अशा सर्व पदभरतींसाठी देखील प्रस्तावित आरक्षण लागू आहे.

कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) सरळसेवा भरती सन २०१९ या परीक्षेकरीता ज्या उमेदवारांनी खुल्या अथवा इतर प्रवर्गातून अर्ज दाखल केला होता परंतु सदरच्या दिनांक २३ ऑगस्ट २०२१ चा शासन निर्णयानुसार, आता जे उमेदवार **अनाथ** या प्रवर्गामध्ये मोडतात अशा उमेदवाराने शासन निर्णयाव्दारे विहित करण्यांत आलेल्या कार्यपध्दतीनुसार सुधारीत नमुन्यातील अनाथ प्रमाणपत्र व **महाराष्ट्र** राज्याचे अधिवास प्रमाणपत्र व इतर अनुषांगिक कागदपत्रे खालील पत्त्यावर पोस्टाने दिनांक २७/०७/२०२२ पर्यंत पाठवावेत.

अधीक्षक अभियंता व संचालक,
पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय
८, मोलेदिना रोड,
कँप ,पुणे - ४११००१

तसेच सदर सर्व संबंधित कागदपत्रे je2019orphan@gmail.com या ई-मेल वर दिनांक २७/०७/२०२२ पर्यंत पाठविण्यांत यावेत.

सदर कागदपत्रे दिनांक २३ ऑगस्ट २०२१ च्या शासन निर्णयानुसार जलसंपदा विभागास विहित प्रपत्रात सादर करणे आवश्यक राहील अन्यथा अनाथ आरक्षणाचा दावा विचारात घेतला जाणार नाही याची कृपया उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(ह. वि. गुणाले)
अध्यक्ष
कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)
राज्यस्तरीय निवड समिती तथा मुख्य अभियंता (जसं)
जलसंपदा विभाग,पुणे